**International Journal of Humanities and Social Science Research**
**ISSN: 2455-2070**
**www.socialresearchjournals.com**
**Volume 1; Issue 2; December 2015; Page No. 63-66**

# नागपूर राज्याचे ब्रिटिश साम्राज्यात विलिनीकरण (1707 ते 1854)

**डॉ. नलिनी खे. टेंभेकर**
[1]सहयोगी प्राध्यापक (इतिहास), शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती।

**सारांष**
स्वतंत्र मराठा राज्याचे रुपांतर पारतंत्र्यात होणे हा भारतीय इतिहासातील महत्वाचा टप्पा आहे। नागपूरकर भोसल्यांचे राज्य हे मराठा सत्तेचे एक मुख्य आधारस्तंभ होते। भोसल्यांचे राज्य रघुजी दुसऱ्याच्या काळात इ.स. 1800 मध्ये उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस गोदावरी व पष्चिमेस वऱ्हाड पासून ते पूर्वेस समुद्रकिनाऱ्यापर्यंत पसरले होते। भारतातील दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकांच्या ताब्यात त्यावेळेस एवढे मोठे राज्य नव्हते। इ.स. 1804 मध्ये नागपूर राज्यात रेसिडेंटचा प्रवेष झाला व हळूहळू त्यांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढतच गेला। लॉर्ड वेलस्लीच्या आक्रमक धोरणाचा मराठा राज्यावर प्रभाव पडून अप्पासाहेबाने वैयक्तिक स्वार्थसिध्दीसाठी तैनाती फौजेचा स्विकार केला व आपले स्वातंत्र्य इंग्रजांना विकले। पुढे लॉर्ड बेंटीक आणि लॉर्ड डलहौसी यांनी मराठा राज्यावर आपली पकड मजबूत करुन मराठा राज्य 1854 मध्ये खालसा केले। कलकत्ता व मुंबई या इंग्रजी केंद्रांना जोडणारे राज्य म्हणून नागपूर ब्रिटिषांना हवे होते।

**कुटषब्दः** रेसिडेंट, तैनाती फौज, खालसा, देऊरचे राजे निजाम, निळकंठषहा, जेन्किन्स, सीताबर्डी, कोलब्रुक, राणी बाकाबाइ।

## 1. प्रस्तावना

मराठ्यांच्या इतिहासात नागपूरकर भोसल्यांना महत्वाचे स्थान आहे। नागपूर भोसल्यांनी स्वपराक्रमाने मराठा संघात आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले। नागपूर प्रदेशावर भोसल्यांची सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी हा प्रदेश देवगडच्या गोंड राजांच्या अधिपत्याखाली होता व नागपूर हे देवगड राज्याचा परगणा म्हणून ओळखले जात होते। गोंड राजाकडून नागपूरचा अधिकार थोरले रघुजी भोसलेंनी मिळविल्यानंतर या राज्याच्या सीमा विस्तारण्याची महत्वपूर्ण कामगिरी केली।

**नागपूर राज्यः** नागपूर भोसल्यांचा मूळ पुरूष परसोजी हा होय। छत्रपती शाहूस ताराबाई विरूद्ध परसोजी भोसल्यांची फार मदत झाली। म्हणून इ।स। 1707 मध्ये त्यास 'सेना साहेब सुभा' हे पद बहाल करून वऱ्हाड–गोंडवण प्रांताची वंशपरंपरागत सनद दिली। इ।स। 1709 मध्ये परसोजीचा मृत्यु झाला। त्यानंतर कान्होजी भोसले यास दुसरा 'सेनासाहेब सुभा' करण्यात आले। परंतु कान्होजी व छत्रपती शाहू यांच्यात अनेक कारणांनी वितुष्ट आल्याने छत्रपती शाहूने कान्होजींचा पुतण्या रघुजी यास कान्होजी विरूद्ध पाठविले। जाण्यापुर्वी शाहूने रघुजीस वाईजवळील देऊरगावचा मोकासा दिला। म्हणून भोसले घराण्याला 'देऊरचे राजे' असा वंशपरंपरागत किताब मिळाला।1 रघुजीने इ।स। 1730 मध्ये कान्होजीस कैद करून साताऱ्यास पाठविले। छत्रपती शाहूकडून इ।स। 1738 मध्ये रघुजीस सनद मिळाली। त्यानुसार 1) लखनौ 2) मकसुदाबाद 3) बेदर 4) बंगाल 5) बितीया 6) बुंदेलखंड 7) इलाहबाद 8) हाजीपूर 9) पाटणा याशिवाय देवगड, गढा, भंवरागड, चांदा या प्रांताची चौथाई व मौकासा हे हक्क वसूल करण्याचा अधिकार मिळाला। रघुजीने कर्नाटक मोहिमेत अर्काट व त्रिचन्नापल्ले जिंकून घेतले। बंगालमध्येही अलीवर्दीखानला इ।स। 1751 मध्ये रघुजीशी तह करावा लागला। अशारीतीने रघुजीने ओरीसा, बंगाल–बिहार प्रांतावर आपला दरारा निर्माण केला।

रघुजीने चंद्रपूरचा गोंड राजा नीळकंठशहाचा पराभव करून त्याचे राज्य आपल्या राज्यात विलीन केले। निजामाकडून नरनाळा, गाविलगड माणिकदुर्ग काबीज केले। तसेच छत्तीसगडावरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले। दि। 14 फेब्रुवारी 1755 रोजी रघुजीचा मृत्यु झाला। त्यानंतर जानोजी भोसले (इ।स।1755 ते 1772) आणि मुधोजी भोसले यांनी मराठा राज्यासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली। पहिल्या रघुजींचा नातू रघुजी द्वितीय हा इ।स। 1788 रोजी वयाच्या 27 व्या वर्षी नागपूर राज्याचा शासक बनला। त्याने आपल्या 12 वर्षाच्या शासन काळात नागपूर राज्याला समृद्धीच्या शिखरावर पोहचविले। दुसरा रघुजी कुशल योद्धा आणि राजनीतिज्ञ होता। मुत्सद्दिपणा आणि दूरदर्शीतेमुळे त्याने आपल्या कारकिर्दीत तैनाती फौजेचा स्विकार केला नाही। इ।स। 1800 मध्ये रघुजींची कारकीर्द आपल्या उत्कर्षाच्या सर्वोच्च शिखरावर होती। त्याची सत्ता उत्तरेस नर्मदेपासून ते दक्षिणेस गोदावरी व पश्चिमेस वऱ्हाड पासून ते पूर्वेस समुद्र किनाऱ्यापर्यंत प्रस्थापीत झाले होती।2

मराठी साम्राज्याचा किंवा हिंदूस्थानातील दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकाच्या ताब्यात त्यावेळेस एवढे मोठे राज्य नव्हते। दुसऱ्या रघुजींच्या कारकिर्दीचा आढावा घेतल्यास असे दिसून येईल की कोणत्याही लढाईत न पडता आपल्या राज्याच्या हिताला त्याने सर्वप्रथम प्राधान्य दिले। इंग्रजांशी वरवर गोडी गुलाबीने बोलून स्वतःला बांधून घेतले नाही। पुणे दरबाराशी त्याने शेवटपर्यंत मित्रत्वाचे आणि मदतीचे संबध ठेवले।

**इंग्रज भोसले संबधः** नागपूरकर भोसल्यांच्या दरबारात ब्रिटिश वकील येण्यास जानोजी भोसल्यांच्या काळापासून प्रारंभ झाला। रॉबर्ट क्लाईव्ह याने झैन–उल–अबेदिन या आपल्या वकिलामार्फत जानोजीस गळ घालण्याचा प्रयत्न केला परंतु जानोजी क्लाईव्हच्या जाळ्यात अडकला नाही। यानंतर गोपाळ पुरी, इलियट, वादरस्टन, ॲडरसन, चॅपमन, फास्टर, कोलब्रुक असे विविध वकील इ।स। 1803 च्या आडगावच्या लढाईपर्यंत येऊन गेले। परंतु कोणत्याही वकीलाला विशेष यश मिळू शकले नाही। यापैकी कोलब्रुक याने दुसऱ्या रघुजीकडे इंग्रजांशी मैत्री व तैनाती फौजेचा करार करण्यासंबधी कसोशीने प्रयत्न चालविले। परंतु रघुजीने गोडी–गुलाबीने वागुन कोलब्रुकशी तसा तह करण्याचे शिताफिने टाळले। शेवटी येथील वकीलात बंद करून आपणांस परत बोलवावे असे कोलब्रुकने निराशेने गव्हर्नर जनरलला लिहीले। परंतु लवकरच परिस्थितीत बदल झाला। दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धामध्ये दुसरा बाजीराव पेशवा व दुसरे रघुजी भोसले, दौलतराव शिंदे यांचा इंग्रजांनी स्वतंत्रपणे पराभव केला। दि। 29 नोव्हेंबर, 1803 च्या आडगावच्या लढाईत नागपुरकर भोसल्यांचा निर्णायक पराभव झाल्यानंतर 17 डिसेंबर, 1803 रोजी देवगावच्या तहाने भोसल्यांना आपल्या दरबारात रेसिडेंट ठेवणे इंग्रजांना भाग पडले। येथूनच इंग्रजाचा भोसल्याच्या राजकारणात चंचुप्रवेश झाला। देवगावच्या तहानुसार नागपूरच्या दरबारी रेसिडेंट म्हणून एल्फिस्टनची नियुक्ती करण्यात आली। ही नियुक्ती एवढी साधी व सरळ बाब नव्हती। लॉर्ड हेस्टिंग्ज रेसिडेंटबाबत आपले मत मांडतांना लिहीतो की, आमच्या सर्व तहनाम्यात आम्ही त्यांना स्वतंत्र, सार्वभौम राजे म्हणून लिहीतो। मग हळूच आम्ही त्यांचे दरबारी आपला रेसिडेंट

पाठवितो। रेसिडेंट परस्परांचा वकील या नात्याने त्या संस्थानिकांशी न वागता त्याचेवर हुकूमत गाजवितो। त्यांच्या सर्व अंतस्थ कारभारात ढवळाढवळ करतो। संस्थानिकांच्या विरूद्ध असलेल्या त्यांच्या प्रजेस आपल्या पाठीशी घालतो व आपल्या अधिकाराचे खूप प्रदर्शन करतो। या सर्व प्रकारात रेसिडेंटास आमच्या कौंसीलचे पाठबळ असते।[3] एल्फिस्टनने तैनाती फौजेसाठी बरेच प्रयत्न केले परंतु ब्रिटीशांचा हा प्रयत्न राज्य खालसा करण्यासाठी आहे हे रघुजी ओळखून होता। ब्रिटीशांच्या सैन्यशक्तीचा अंदाज घेऊन रघुजीने रेसिडेंटशी फारसे विरोधाचे धोरण पत्करले नाही। अथवा रेसिडेंटच्या बतावनीला फसून तैनाती फौजही स्वीकारली नाही। यातच रघुजींचे आपल्या राज्याविषयीचे मुत्सद्देगिरीचे धोरण दिसून येते। 25 जानेवारी 1807 रोजी एल्फिस्टनच्या जागी नागपूरचा रेसिडेंट म्हणून जेन्किन्स ची नियुक्ती करण्यात आली। दिनांक 22 मार्च, 1816 रोजी रघुजी दुसऱ्याचा मृत्यु झाला। रघुजीचे त्याचा एकुलता एक पुत्र परसोजीवर फार प्रेम होते तो शरीराने व मनाने पंगु असल्याने, आपल्या मृत्युनंतर परसोजीने गादीवर बसावे आणि आपला पुतण्या दुसरा मुधोजी उर्फ अप्पासाहेब याने परसोजीच्या नावाने राज्यकारभार करावा अशी त्याची इच्छा होती।4 परंतु अप्पासाहेब महत्वाकांक्षी होता व गादीसाठी प्रयत्नशील होता। त्यामुळे भोसल्यांच्या दरबारात दोन पक्ष पडले। परसोजींची बाजू, रघुजी दुसऱ्याची चतूर्थ पत्नी रानी बाकाबाई गुजाबादादा गुजर आणि धर्माजी भोसले यांनी घेतली। राजा परसोजीस हवेलीत आणून त्याच्या भोवती पहारा बसविला। कारण परसोजीला नाममात्र गादीवर बसवून राज्यकारभार आपल्या हाती घेण्याची बाकाबाईची इच्छा होती। दुसरा पक्ष दुसरे मुधोजी उर्फ अप्पासाहेबांचा होता। तो भोसल्यांच्या घराण्यातील कर्ता पुरूष होता। परसोजीच्या नावे उत्तम कारभार करीन, अशी शपथ घेऊन अप्पासाहेबाने मुत्सदी व्यक्तींना आपल्याकडे वळविले। व धर्माजीस कैद करून अप्पासाहेबाने 14 एप्रिल 1816 रोजी परसोजीला गादीवर बसविले आणि परसोजी तर्फे मुख्यत्यार या नात्याने संपूर्ण कारभार आपल्या हाती घेतला।[5]

**तैनाती फौजेचा तह (इ.स. 1816):** यावेळी यशवंत रामचंद्र हा इंग्रजांकडे वकील असून तो रेसिडेंट जेन्किन्सच्या विश्वासातील होता। त्याच्या तर्फे अप्पासाहेबाने इंग्रज रेसिडेंट कडे संधान बांधले। रेसीडेंट जेन्किन्सही अप्पासाहेबास वळविण्याच्या प्रयत्नात होता। भोसले घराण्यातील अंतर्गत कलहाचा फायदा घेऊन तैनाती फौजेचा तह घडूवन आणावा हा त्यांचा उद्देश होता। अप्पासाहेबांचा दिवाण नागोपंताच्या घरी रसिडेंट जेन्किन्स व सौथबी साहेब हे रात्री येऊन नागोपंत, यशवंतराव, नारायण गोपाळ, पंडितजी व अप्पासाहेब यांच्यात खलबते होऊन 28 मे 1816 रोजी तैनाती फौजेच्या तहनाम्यावर अप्पासाहेब व रेसिडेन्ट जेन्किन्स यांनी सह्या केल्या।6 या तहाने भोसल्यांचे स्वातंत्र्य कायमचे गेले। हे जेन्किन्सचे सर्वात मोठे यश होते। तहाचे स्वरूप आणि अटी तर गव्हर्नर जनरल कडूनच आल्या होत्या। त्या जशाच्या तशा मान्य करण्यात आल्या। तैनाती फौजेची संख्या व याबद्दल अप्पासाहेबाला कंपनी सरकारला द्यावी लागणारी रक्कम या तहात निहीत होती। नागपूरचे राज्य ब्रिटीशांचे मांडलिक राज्य बनले। 1 फेब्रुवारी 1817 रोजी परसोजीचा बिछाण्यात मृत्यु झाला। यावेळी अप्पासाहेब चंद्रपूरला होते।7 भोसले घराण्यात अप्पासाहेबाशिवाय दुसरा पुरूष नसल्याने विरोधकांचे काही चालले नाही। चंद्रपूरहून परत आल्यानंतर 21 एप्रिल 1817 रोजी अप्पासाहेब सेनासाहेब सुभा म्हणून नागपूरच्या गादीवर बसले आणि सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे पुण्याहून आणण्याकरीता पुण्यास आपला वकील पाठविला। परंतु हळू–हळू अप्पासाहेब व जेन्किन्स संबध बिघडू लागलेत। जेन्किन्सचे वाढते वर्चस्व आणि तैनाती फौजेच्या जाचक अटी अप्पासाहेबास मान्य नव्हत्या। तिकडे इंग्रज–पेशवे संबध देखील बिघडले होते। इंग्रजांच्या शत्रूकडून वस्त्रे स्वीकारू नयेत असे जेन्किन्स याने अप्पासाहेबास बजावले। उलट रेसिडेन्ट ने आपल्या राज्यरोहणाच्या समारंभास उपस्थित राहावे असा आग्रह धरला। याचवेळी अप्पासाहेबाने गुप्तपणे इंग्रजाविरूद्ध पेशवे आणि पेंढाऱ्याशी संधान बांधले आहे, अशी बातमी जेन्किन्सला कळली होती। 24 नोव्हेंबर 1817 रोजी अप्पासाहेबाने सेनासाहेब सुभा हा किताब व वस्त्रे स्विकारली। जेन्किन्स या समारंभाला उपस्थित नव्हता। त्यातून दोहोंमधील संबध विकोपास जाऊन 26–27 नोव्हेंबर रोजी उभय पक्षात सीताबर्डीची लढाई झाली।

**सीताबर्डीची लढाई (1817):** नागपूरात सीताबर्डीच्या दोन टेकड्या आहेत। त्यावर स्कॉटची नेमणूक केली गेली। 24 नोव्हे। 1817 रोजी इंग्रजांनी दोन्ही टेकडया आपल्या ताब्यात घेतल्या। 26 नोव्हेंबर 1817 रोजी भोसल्यांच्या अरब सैन्याने सीताबर्डीच्या टेकडीवर गोळीबार सुरू केला आणि युद्धाला तोंड फुटले। अरब सैन्याने लहान टेकडी जिंकली व भोसल्यांचा भगवा झेंडा रोवला। तेव्हा फिटझिरॉल्डने अरबांवर जोरदार हल्ला करून त्यांना पिटाळून लावले व लहान टेकडी जिंकली। तेवढयात अरबांच्या दारूगोळयांच्या कोठारास आग लागून भडका उडाला। त्यामुळे त्यांच्यात गोंधळ निर्माण झाला। मोठ्या टेकडीवरून इंग्रजांचा मारा झाला व अरब पळून गेले। अप्पासाहेब खंबीर आणि निधडया छातीचा वीर नसल्यामुळे त्याने युद्धाचे नेतृत्व केले नाही। त्याने लढाई सक्कदऱ्याच्या राजवाडयातून पाहिली, सीताबर्डीची लढाई सुमारे वीस तासात भोसल्यांच्या अपयशाने संपून अप्पासाहेब इंग्रजांच्या ताब्यात आला। संपुर्ण नागपूर शहर इंग्रजांच्या अधिकाराखाली आले। 6 जानेवारी 1818 रोजी रेसिडेंट व अप्पासाहेबास यांच्यात झालेल्या तहानंतर 9 जानेवारी रोजी अप्पासाहेबास परत राजवाडयात जाण्याची परवाणगी देण्यात आली। परंतु अप्पासाहेबाने पुन्हा इंग्रजांविरूद्ध हालचाली सुरू केल्या। अप्पासाहेबांचे बाजीराव दुसऱ्याला पाठविलेले पत्र मध्येच पकडले गेले। तेव्हां 15 मार्च 1818 रोजी अप्पासाहेबास पदच्यूत करून कैद करण्यात आले व अलाहबाद कडे पाठविले। परंतु 13 मे रोजी अप्पासाहेब रायचूर येथे असतांना इंग्रजांच्या तावडीतून निसटले पूढे 15 जुलै 1840 रोजी त्याचा जोधपूर येथे मुत्यु झाला।[8]

अप्पासोहबास पदच्युत केल्यानंतर नागपूरचे राज्य खालसा करण्याचा विचार ग।ज।लॉर्ड हेस्टिंग्जच्या मनात आला होता। परंतु त्यावेळी सर्वत्र ब्रिटीश विरोधी वातावरण असल्याने नागपूर सारख्या मोठ्या राज्याचा घास पचणार नाही हे ओळखून ग।ज।लॉर्ड हेस्टिंग्ज याने (1813 ते 23) दुसऱ्या रघुजीच्या मुलीकडील नातू यास गादीवर बसवून अप्पासाहेबास पदच्युत करावे असे ठरविले होते। त्यानुसार 25 जून 1818 ला परसोजीची पत्नी दुर्गाबाई हिच्या मांडीवर बाजीबा उर्फ बाजीराव (रघुजीची कन्या बनुबाई व व्यकंटराव व गुजर यांचा मुलगा) यास दत्तक देण्यात येऊन त्याचे नाव तिसरा रघुजी ठेवण्यात आले व त्याला 26 जून 1818 रोजी नागपूरच्या गादीवर बसविले।9 तो अल्पवयस्क असल्याने राणी बाकाबाई हिने तिसऱ्या रघुजीचे पालकत्व व रिजंट या नात्याने कारभार करावा असे ठरले। गुजाबादादा गुजर आणि जेन्किन्सच्या विश्वासातील सिद्दिक अलीखान यास मुख्य कारभारी नेमण्यात आले। परंतु बाकाबाई नावाचीच रिजंट होती। कारण राज्याचा मुलकी अधिकार पूर्णपणे जेन्किन्सच्या हातात होता।

इ।स। 1826 मध्ये तिसरा रघुजी सज्ञान झाला होता। त्यामुळे राजाशी नवीन तह करून नागपूरचा कारभार त्याचेकडे हस्तांतरीत करावा असे गव्हर्नर जनरलने रेसिडेंटला सुचविले। 6 जानेवारी 1818 रोजी अप्पासाहेबांशी जो तात्पुरता तह झाला होता त्याला वैधानिक रूप मिळवून देणे ही या तहामागील उद्देश होता। 12 डिसेंबर 1826 मध्ये झालेल्या या तहाच्या महत्वाच्या अटी पुढील प्रमाणे होत्या। (1) राजाने सर्व संस्थनिकांषी सर्व संबंध तोडून द्यावेत, फक्त सेनासाहेब सुभा हा किताब राहिल। राजाने इंग्रजांच्या मध्यस्तीवाचून इतर संस्थानिकांषी संबंध ठेवू नयेत। (2) तैनाती फौजेचा साडे सात लक्ष

रु। खर्चाचा प्रदेष इंग्रजास तोडून द्यावा। (3) चांदा, देवगड, वरघाट, लांजी, छत्तीसगड हे जिल्हे व त्यातील मांडलीक यावर इंग्रजांचा अंमल राहील। ह्या जिल्ह्यांचा खर्च वजा जाता राहील ते उत्पन्न दरसाल 17 लक्ष रु। इंग्रजांनी राजाला द्यावे। बाकीचा प्रांत व नागपूर यावर राजाने अंमल करावा। या 17 कलमी तहाव्दारे राज्यकारभार जरी प्रत्यक्ष तिसऱ्या रघुजीच्या हाती आला तरी रेसिडेंटला राजाच्या कामात हस्तक्षेप करण्याचे इतके अधिकार मिळाले की, एका इंग्रज अधिकाऱ्याने म्हटल्या प्रमाणे, ''राजा राज्य करीत नसून रेसिडेंट आपल्या अधिकाऱ्यांमार्फत राजाच्या हाताने राज्य करीत आहे अषी स्थिती झाली''।[10] हा तह झाल्यानंतर जेन्किन्स 29/12/1826 रोजी रेसिडेन्सीचा चॉर्ज कॅप्टन हॅमिल्टन यास देऊन नागपूर सोडून गेला।

**वाईल्डर ते डेव्हिडसन(1827–1850):** एफ। बी. वाइल्डर ने 12 एप्रिल 1827 रोजी रेसिडेन्टची सूत्रे हाती घेतली। इ।स।1829 मध्ये त्याने तिसऱ्या रघुजी बरोबर सात कलमी तह केला। या तहाव्दारे रघुजीला इतर संस्थानिकांप्रमाणे मानाने वागविण्याचे इंग्रजांनी मान्य केले। (1) चांदा, भंडारा, देवगड व छत्तीसगड हे जिल्हे परत राजास द्यावे। (2) राजाकडील सर्व मुलकी व लष्करी इंग्रज अधिकारी काढून घ्यावे व तैनाती फौजेकरीता 8 लक्ष रुपये राजाने इंग्रजास द्यावे आणि 1 हजार अनियमित घोडदळ स्वतःच्या खर्चाने ठेवावे असे ठरले। त्यानुसार 6 जून 1830 रोजी वर नमुद केलेले जिल्हे राजाला परत मिळाले।[11] इ.स. 1830 मध्ये वाईल्डर परतला। वाईल्डर नंतर ग्रोमे (1830–1833) हा नविन रेसिडेंट आला। त्याने आपल्या काळात केलेली महत्वपूर्ण कामगिरी म्हणजे चांदा, भंडारा, देवगड व छत्तीसगड हे चार जिल्हे रघुजीकडे सोपविले व या विभागातील इंग्रज अधिकारी काढून घेण्यात आले। ग्रोमेनंतर कर्नल ब्रिग्ज (1834–1835), कॅव्हेंडिष (1835–1839) आणि विल्किन्सन (1839–1844) हे तिसऱ्या रघुजीच्या दरबारी होते। 1844 पर्यंत तिसऱ्या रघुजीने रेसिडेंटची मर्जी सांभाळूनच कारभार केला। तिसऱ्या रघुजीच्या कारभारावर रेसिडेंटचा प्रभाव कायम होता। मात्र हळू हळू त्याला रेसिडेंटची बंधने जाचक वाटू लागली होती। तिसऱ्या रघुजीला इ।स।1831 च्या मे महिन्यात पुत्र (निंबाजी) झाला। मात्र तो पाच महिन्याचा असतांना गंभीर आजारी पडला। रेसिडेंट ग्रोमेने डॉ. वायली कडून उपचार करविला मात्र 22 ऑक्टोबर 1831 रोजी त्याचे निधन झाले।

तिसऱ्या रघुजीला इ.स. 1829 च्या तहाने राज्यकारभार करण्याचे स्वातंत्र्य मिळाले असले तरी त्यावर अंकुष मात्र रेसिडेंटचा होता। राज्याची माहिती देण्यास रघुजीचा विरोध असल्याने रेसिडेंटने गुप्तपणे राजा व राज्याबद्दल माहिती प्राप्त करण्याचे प्रयत्न सुरु ठेवले त्यामुळे तिसरे रघुजी व कॅव्हेंडिष यांच्यात मतभेदाला सुरुवात झाली। परिणामी तिसऱ्या रघुजीला दत्तक घेता येणार नाही असे प्रतिपादीत करुन तिसऱ्या रघुजीच्या मृत्यूनंतर नागपूर राज्य खालसा करण्याकरीता लागणारी पार्ष्वभुमी त्याने तयार केली होती।[12]

12 सप्टेंबर 1844 रोजी विल्किन्सनच्या जागी कर्नल स्पियर्स रेसिडेंट म्हणून आला। नोव्हेंबर महिन्यात रघुजी गंभीर रित्या आजारी पडला व त्याची बरी होण्याची चिन्हे दिसेनात। तेव्हा दत्तक किंवा वारसाचा प्रष्न पुन्हा उपस्थित झाला व स्पिअर्सने गव्हर्नर जनरलकडे याबाबत विचारणा केली असता, ''एकंदरीत राज्याच्या भवितव्याचा प्रष्न त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील'' असे सांगण्यात आले।[13] रेसिडेंटचा राज्यकारभारातील अत्याधिक हस्तक्षेप व पुत्र नसने ह्यामुळे रघुजी व्यसनाधिन झाला व राज्यकारभाराकडे त्याचे दुर्लक्ष झाले। स्पिअर्सने 26 फेब्रुवारी 1846 रोजी कॅप्टन रॅम्सेकडे आपल्या पदाचा कार्यभार सोपविला। रॅम्सेने राज्यकारभारात वाजवीपेक्षा जास्त हस्तक्षेप करणे सुरु केल्याने राजा व रेसिडेंट यांचे संबंध पार बिघडले। तिसऱ्या रघुजीच्या खर्चावर कात्री लावण्यामुळे व रघुजीच्या अधिकाऱ्यांना नोकरीतून काढण्यावरुन रॅम्से व तिसरा रघुजी यात वाद निर्माण झाला। हा वाद गव्हर्नर जनरल पर्यंत गेला। षेवटी तिसऱ्या रघुजीला माघार घ्यावी लागली। रॅम्सेच्या जाचाला कंटाळून रघुजी राज्यकारभाराकडे लक्ष देईनासा झाला व रेसिडेंटला टाळू लागला। सैन्याचे पगार तुंबले होते। तिसऱ्या रघुजीने भावी उत्तराधिकाऱ्यांची व्यवस्था केली नव्हती। याऊलट रेसिडेंट गव्हर्नर जनरलषी याबाबतीत चर्चा करीत होते। डेव्हिडसन 1850 पर्यंत नागपूरचा रेसिडेंट होता।

**रेसिडेंट मॅनसेल व नागपूर राज्य खालसा (1850–1854):** 11 डिसेंबर 1850 रोजी रेसिडेंट मॅनसेल याने डेव्हिडसन कडून कार्यभार घेतला। व्यसनामुळे रघुजीची प्रकृती खालावली रघुजी आणि मॅनसेल संबंध पार बिघडले होते। 16 नोव्हेंबर पासून तिसरा रघुजी आजारी पडला ताप असतांना स्नान करणे, हिंडणे, दारु पिणे, निरोगी मानसाप्रमाणे सर्व व्यवहार करणे यामुळे प्रकृती अधिकच बिघडली आपल्या मृत्यूनंतर वारस कोण, राज्याचे काय होईल याचा विचार तिसऱ्या रघुजीने केला नव्हता। मात्र राजाच्या विचित्र वागणुकीमुळे व रेसिडेंटषी बिघडलेल्या संबंधामुळे रेसिडेंटचा निष्चय नागपूर राज्य खालसा करण्याचा होता। 11 डिसेंबर 1853 रोजी सकाळी 6 वाजता तिसरा रघुजी वयाच्या 47 व्या वर्षी निपुत्रिक मरण पावला। मृत्यूपूर्वी मॅनसेल राजवाड्यात भेटीकरीता गेला असतांना तिसऱ्या रघुजीने त्याला भेटण्याचे नाकारले यावरुन त्याच्या मनात इंग्रजांविषयी किती असंतोष होता हे स्पष्ट होते। मॅनसेलने भोसल्यांचा खजिना आणि षिक्कामोर्तब अधिकारात घेऊन 13 मार्च 1854 रोजी नागपूर रेसिडेन्सीतून नागपूरचे राज्य खालसा झाल्याचे जाहीर केले।[14]

**निष्कर्षः** इ. स. 1854 मध्ये नागपूरचे राज्य खालसा करण्याचे कार्य डलहौसीने केले। यासंबंधीच्या आपल्या अहवालात तो म्हणतो की, ''इंग्लंडची भरभराट व व्यापार कापसावर अवलंबून असल्याने कापसाचा हा प्रांत इंग्रजांच्या हाती आल्यास इंग्लंडच्या कारखानदाराचा व व्यापाऱ्यांचा चांगला फायदा होईल। तसेच नागपूरच्या पष्चिमेकडील खानदेष, वऱ्हाड आणि पूर्वेस ओरिसा हे प्रांत पूर्वीच इंग्रजाच्या ताब्यात असल्यामुळे इंग्रजांना प्रदेषाचा, पैषाचा व लष्करी सोयीचा फार मोठा फायदा होईल'' ह्या वक्तव्यावरुन नागपूर राज्य ब्रिटिषांच्या दृष्टीने किती महत्वाचे होते ते लक्षात येते।

**संदर्भ ग्रंथ सुची**


1. अंधारे भा। रा, अखेरचा सेनासाहेब सुभा, तिसरे रघुजी भोसले (1818–1853), विष्वभारती, प्रकाषन, नागपूर, 2003 पृष्ठ क्र.– 2
2. अंधारे भा.रा.–'आधुनिक नागपूर नगरीचे षिल्पकार दुसरे रघुजी भोसले' (1788–1816), विष्वभारती प्रकाषन, नागपूर, 2002, पृष्ठ क्र. – 27
3. सोनटक्के, कापसे (संपादक), संषोधन सुमने, अमृत महोत्सव समिती, नागपूर, 2010, पृष्ठ क्र. – 87
4. काळे, या.मा.नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, विदर्भ संषोधन मंडळ, नागपूर, वर्ष 1979, व्दितीय, आवृत्ती, पृष्ठ क्र. – 260
5. अंधारे भा. रा, अखेरचा सेनासाहेब सुभा, तिसरे रघुजी भोसले (1818–1853), उपरोक्त, पृष्ठ क्र. – 8
6. अंधारे भा. रा, भोसले कालीन नागपूर, विष्वभारती प्रकाषन, नागपूर, 2001, पृष्ठ क्र. – 66
7. राजूरकर अ.ज. चंद्रपूरचा इतिहास – हरिवंष प्रकाषन, चंद्रपूर 2008, पृष्ठ क्र. – 294
8. राजूरकर अ.ज. उपरोक्त, पृष्ठ क्र.–301–302

9. Sinha H.N. Selection from the Nagpur Residency Records Vol – IV, LA46, Govt. Press Nagpur, 1949, Page No. 72
10. काळे, या।मा। उपरोक्त, पृष्ठ क्र. – 328
11. Sinha H.N. Selection from the Nagpur Residency Records Vol – V, Govt. Press Nagpur, case file No.11844, Page No. – 496 to 499
12. काळे, या.मा. उपरोक्त, पृष्ठ क्र. – 331
13. काळे, या.मा. उपरोक्त, पृष्ठ क्र. – 340
14. अंधारे भा. रा, अखेरचा सेनासाहेब सुभा, तिसरे रघुजी भोसले (1818–1853), उपरोक्त पृष्ठ क्र. – 63 ते 66